


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २४२ वा गुरूवार दि २० नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात कोल्डवॉर सुरु, सुषमा अंधारे यांचा धक्कादायक दावा

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पडद्यामागे प्रचंड घडामोडी सुरु आहेत. महायुतीत सध्याच्या घडीला सारं काही आलबेल आहे, असं म्हणता येणार नाही. कारण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाराजी समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाच्या माजी नगरसेवकांना भाजपने प्रवेश दिला. विशेष म्हणजे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपने शिवसेनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांना आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे. तसेच शिंदेंच्या मंत्र्यांनी विधानसभा निवडणुकीत ज्यांचा पराभव केला त्यांना पक्षात घेऊन भाजपने त्यांना ताकद दिली. त्यामुळे नाराज एकनाथ शिंदे आज थेट दिल्लीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीला गेले. एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्यात जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेत एकनाथ शिंदे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची तक्रार केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रवींद्र चव्हाण पैसे देवून माजी नगरसेवक फोडत असल्याचा आरोपही एकनाथ शिंदेंनी आपल्या तक्रारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या घडामोडींवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी धक्कादायक दावा केला आहे. ङ्गअमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातीस कोल्डवॉर लपून राहिलेला नाही. त्यामुळे अमित शाह यांच्या जवळचा जो असतो तो देवेंद्र फडणवीस यांच्या रडारवर असतो. तसेच जो देवेंद्र फडणवीस यांच्या रडारवर असतो तो अमित शाह यांना फार प्रिय असतो. त्यामुळेच रवींद्र चव्हाण यांनी आमची माणसं फोडली असतील तर याची दाद कुणाकडे मागायची म्हणून कदाचित एकनाथ शिंदे त्यांच्याकडे जात असतील, असं सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत. उपमुख्यमंत्रीपदाची महत्त्वकांक्षा असणारे उदय सामंत आपल्या जवळचा गट घेऊन कदाचित भाजपसोबत जातीलच. काय प्रोब्लेम आहे? कारण आता संदीपान भुमरे, संजय शिरसाट, दादा भुसे, भरत आप्रकारे त्रस्त झालेली आहेत. निश्चितपणे या सगळ्यांचा शिंदे यांच्यापेक्षा उदय सामंत यांच्याकडे कल जास्त आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातल जो रंजकपट २०२२ ला शिंदेंनी नाटकाचा पहिला अंक दाखवला होता, त्याचा दुसरा अंक आता सुरु आहअसादेखील दावा सुषमा अंधारे यांनी केला. एकनाथ शिंदे यांचं भाजपसोबत येणं आणि सरकार स्थापन करणं या सगळ्या गोष्टींचे शिल्पकार अमित शाह आहेत. या सगळ्या गोष्टींमध्ये एकनाथ शिंदे यांचा एकमेव तारणहार आणि मसिहा हे अमित शाह आहेत. अमित शाह यांच्याशिवाय आपलं म्हणणं कुणी ऐकू शकत नाहीत याची त्यांना कल्पना आहे. तसेच अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात काय कोल्डवॉर चालू आहे याची एकनाथ शिंदे यांना कल्पना आहे. त्या कोल्डवॉरमध्ये अमित शाह निश्चितपणे आपली मदत करु शकतात, असं त्यांना वाटत आह असा खळबळजनक दावा सुषमा अंधारे यांनी केला आहे. इकडे महाराष्ट्रात रवींद्र चव्हाण मंत्री उदय सामंत यांना भेटतात किंवा उदय सामंत स्वत: जावून रवींद्र चव्हाण यांना भेटतात. हे सगळं बघितलं तर उदय सामंत हे माझ्याकडे एवढ्या आमदारांचा गट आहे, मी विलिन होण्यास तयार आहे पण आम्हाला किमान सोडा. आम्हाला या त्रासात



नको, असं सुद्धा उदय सामंत म्हणून शकतात, असा दावा सुषमा प्रश्न यांनी केला आहे. राहिला प्रश्न तर भाजप नेते केशव उपाध्याय म्हणत आहेत की, नाही या सगळ्यांना वेगळी किनार नाही. याला वेगळी किनार नसेल तर ऐन निवडणुकीच्या काळात जिथे नगर परिषदेचे धामधुम सुरु आहे, असं सगळं सुरु असताना असं कोणतं संकट आलं की, एकनाथ शिंदे यांना दिल्लीत जावून अमित शाह यांची भेट घ्यावी लागली? कारण जेव्हा ते रागावतात तेव्हा एकतर दिल्लीत जावून अमित शाहांची भेट घेतात किंवा दरेगावात जातात, अशी प्रतिक्रिया सुषमा अंधारे यांनी दिली आहे.

# ऑनलाईन गेमिंगचा अन् शेअर मार्केटचा नाद; कर्ज झाल्यानं वडिलांची तोडली, नंतर थेट बँकेतच डल्ला; बँक मॅनेजरचा कारनामा

वृत्तसंस्था/भंडारा

काही महिन्यांपूर्वी धाराशिवमध्ये एका युवकाने ऑनलाईन जुगाराच्या आहारी जाऊन कर्जबाजारी झाल्याने आपलं जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेनंतर ऑनलाईन जुगार आणि गावखेड्यातील तरुणाईचा मुद्दा चर्चेत आला. मात्र, अद्यापही ऑनलाईन जुगाराच्या नादात तरुणाई आर्थिक खाईत जात असल्याचं दिसून येत आहे. भंडाऱ्याच्या तुमसर येथील कॅनरा बँकेतील सहायक मॅनेजरनं बँकेतील रक्कम ही ऑनलाईन गेमिंच्या नादातच लुटल्याचं समोर आलं आहे. एखाद्या सिनेमाला शोभेल असा चोरीचा प्रकार भंडाऱ्यात उघडकीस आला. भंडाऱ्याच्या तुमसर तालुक्यातील चिखला मॉइल्सच्या कॅनरा बँकेत काल चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. चक्क बँकेतील मॅनजरनेच ही चोरी केली असून तब्बल दीड लाख रुपयांची बँकेतील रोकड बँकेच्या सहाय्यक मॅनेजरनं लुटल्याची धक्कादायक बाब या घटनेतून समोर आली. याप्रकरणी भंडारा पोलिसांनी चिखला मॉइल्स येथील कॅनरा बँकेचे सहाय्यक मॅनेजर मयूर नेपाले (वय ३२) याला अटक केली आहे. ऑनलाइन गेमिंग, शेअर मार्केट ट्रेडिंगचं कर्ज, यासोबत अन्य असं लाखो रुपयांचं कर्ज असल्यानं ते परतफेड करण्यासाठी सहाय्यक मॅनेजरनेच बँक लुटली. या बँके मॅनेजरकडून पोलिसांनी ९६ लाखांची रोकड जप्त केली आहे. यासह या चोरीच्या रकमेसाठी वापरण्यात आलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनासह मोबाईल व अन्य असा १ कोटी ७ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकाराने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. कॅनरा बँकेत सहाय्यक बँक मॅनेजर असलेल्या मयूर नेपाले याला ऑनलाइन गेमिंग, शेअर मार्केट ट्रेडिंगचा छंद होता. यामुळे त्याच्यावर लाखो रुपयांचं कर्ज झालं होतं. स्वत:च्या डोक्यावर झालेल्या कर्जाच्या बोजामुळे मयूर नेपाले याने स्वत:च्या वडिलांची ८० लाखांची आणि बँकेतील अन्य दोन ग्राहकांची ३२ लाखांची अशा तीन तोडून रक्कम उचल केली होती. यासोबतचं मयूरने याच्यावर घेतलेल्या कारचं कर्ज, मित्रमंडळींकडून



घेतलेले २० लाखांचे हातउसने कर्ज, शैक्षणिक कर्ज, पेटीएमचं कर्ज असं सुमारे ९० लाखांचं कर्ज त्याच्यावर होतं. बँकेची चावी नेपाले याच्याकडेच असल्याने आणि स्ट्राँग रूमची जबाबदारी त्याच्यावरच असल्याने त्याने जाणीवपूर्वक लॉक केलं नव्हतं. पहाटेच्या सुमारास त्याच्या दुचाकीने येऊन बँकेतील सीसीटीव्ही कॅमेरे आणि डीव्हीआर काढला. त्यानंतर मोठ्या बॅगमध्ये ही रक्कम भरून दुचाकीनेच तो नागपूरला गेला होता. मात्र, अखेर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अवकाशातील शक्तिशाली डोळा



## संपादकीय लेख

इस्रो आणि नासा या दोघांनी मिळून अवकाशात सोडलेला ङ्ग निसार म (नासा-इस्रो सिंथेटिक ॲपर्चर रडार) हा उपग्रह म्हणजे वसुंधरेवर अखंड लक्ष ठेवणारा, बारीकसारीक बदल टिपणारा, लहानातली लहान घडामोड ताबडतोब अचूकपणे नोंदविणारा एक खबऱ्याच आहे. पृथ्वीवरच्या दोन टोकांवर असणाऱ्या देशांनी एकत्र येऊन त्याची निर्मिती केली आहे आणि संपूर्ण मोहीमसुद्धा ते एकत्रच राबवणार आहेत. परवाच्या ३० जुलैला अवकाशात झेप घेतलेला हा उपग्रह, आत्ता पृथ्वीपासून ७३७ किमी अंतरावर आहे. त्याला आता ७४७ किमी अंतरावर न्यायचे आहे. हे काम करायला ४५ ते ५० दिवस लागतील. एकदा तो अपेक्षित स्थानी पोचला की त्याच्यावरचे रडार कार्यान्वित करण्यात येतील. त्यानंतर ते आपले काम सुरू करील. पृथ्वीवरची जमीन, पाणी, बर्फ यावर घडणाऱ्या घडामोडींची माहिती गोळा करत राहील. पर्यावरणात होणारे बदलही हा उपग्रह टिपेल. मुख्य म्हणजे पृथ्वीवरील हवामान कसेही आणि कितीही पालटले, तरीही या उपग्रहाची ङ्गनजरफ ते सारे अडथळे पार करून आरपार जाईल आणि जमिनीवर काय चालले आहे, त्याची नोंद करत राहील. पृथ्वीवर सतत बदल घडत असतात. या बदलांमधील काही नैसर्गिक असतात तर काही माणसामुळे होत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये माणसाची वस्ती ङ्गधोकादायकफ म्हणता येईल, अशा जागीसुद्धा होऊ लागली आहे. धोकादायक म्हणजे कोणती ठिकाणे? तर हवामानातील बदलांमुळे सागराची सरासरी पातळी वाढत आहे. या वाढत्या पातळीचा ज्या सागर किनाऱ्यांना फटका बसणार आहे, अशा किनाऱ्यांनजीकही मानवी वस्ती झाली आहे. मुंबई आणि परिसराकडे नजर टाकली तरी याचे प्रत्यंतर आपल्याला येते. अशा ठिकाणांसोबतच भूकंपप्रवण जागा, भूस्खलन होण्याची शक्यता असणारी ठिकाणे, अशा जागांवर हा उपग्रह नजर ठेवेल. अशा ङ्गधोकादायकफ ठिकाणांमध्य होत असलेले बदल टिपण्याची, त्याबाबत अधिकाधिक माहिती गोळा करण्याची आता नितांत गरज आहे. किनारपट्टीवर होणारे बदल, समुद्रातील विविध प्रवाह, समुद्रावरील वाऱ्याची गती, समुद्रात होणारी तेलगळती या घटकांची माहिती गोळा करण्याचे कामही ङ्गनिसारफ करील.

पृथ्वीवरील बर्फाळ प्रदेश, ध्रुवीय प्रदेश, हिमाच्छादित पर्वत या साऱ्यांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये बदल होत आहेत. अलीकडच्या काळात हे बदल अधिक वेगाने होत आहेत. या बदलांचे संभाव्य परिणाम भीषण असतील. ते टाळावयाचे, तर या सर्वच भागांत सतत होणारे बदल टिपणे आणि त्याबाबतची माहिती अद्ययावत करत राहणे महत्त्वाचे आहे. याचे कारण त्यातूनच आपल्याला ङ्गउद्या काय होऊ शकेलफ याची नीट कल्पना येईल आणि संभाव्य दुष्परिणाम टाळण्यासाठी वेळीच हालचाली करता येतील. थोडक्यात काय, तर हा उपग्रह आपल्या पृथ्वीच्या भूपृष्ठाची, त्यावरील पाणी आणि बर्फ यांची माहिती देत राहील. मुख्य म्हणजे दक्षिण ध्रुवावरील बदलांची माहिती मिळत राहील. निसारफद्वारे मिळणाऱ्या या माहितीमुळे संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यनिर्मित संकटे यांच्याशी सामना करण्यासाठी आवश्यक ती तयारी करणे संबंधित देशांच्या सरकारांना शक्य होईल. तसेच हे धोके टाळण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करून आवश्यक त्या हालचाली करता येतील. उदाहरणार्थ, भूकंपप्रवण भागाची माहिती ङ्गनिसारफमुळे सतत मिळत राहील. त्यामुळे तेथील भूकवचाच्या हालचालींचा अभ्यास करता येईल. त्या अभ्यासातून भूकवचात होणारे बदल समजू शकतील. भूकंपांप्रमाणेच ज्वालामुखींचा उद्रेकही संहारक ठरू शकतो. ज्वालामुखींच्या बदलांतील माहितीमुळे त्यांच्या उद्रेकाचा अंदाज बांधणे शक्य होईल. प्रदूषण आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम, जागतिक पातळीवरच हवामानात होत असलेले बदल आणि त्याचे जागोजागी दिसू लागलेले परिणाम या गोष्टी आता नवीन नाहीत. पर्यावरणीय माहिती गोळा करत राहणे आणि त्याचा अभ्यास करणे हा संभाव्य धोके टाळण्याचा एक मार्ग आहे. अशी उपयुक्त माहिती सतत मिळत राहणे यापूर्वी अशक्य होते; पण आता ङ्गनिसारफ हे काम करणार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलांचे महत्त्व खूपच मोठे आहे. तर या वनांचा, तेथील बदलांचा, तेथील घडामोडींचा, माणसाच्या उपद्व्यापांचा वेध आता घेता येणार आहे. अगदी घनदाट अरण्याचाही, म्हणजे भर माध्यान्हीला जिथे सूर्याचे किरण भूमीला स्पर्श करू शकत नाहीत, अशा ठिकाणाचासुद्धा वेध घेणे ङ्गनिसारफकडच्या एल बँड रडारमुळे शक्य होणार आहे. तर एस बँड रडारमुळे जगभरातल्या शेतीवर, तेथील पिकांवर लक्ष ठेवता येणार आहे. निसार हा २३९२ किलो वजनाचा उपग्रह, अमेरिकेची नासा आणि भारताची इस्रो या अवकाश संशोधन करणाऱ्या दोन संस्थांच्या सहकार्याने तयार झाला आहे. या मोहिमेसाठी नासाने सुमारे ११६ कोटी अमेरिकी डॉलर, तर इस्रोने नऊ कोटी अमेरिकी डॉलर खर्च केले आहेत. पृथ्वीवरची जमीन, तिथली वनराजी आणि बर्फाळ प्रदेश यांच्यामध्ये होत असलेल्या बदलांचा अभ्यास करण्यासाठी अवकाशात उपग्रह पाठविण्याची आवश्यकता आहे, अशी कल्पना सन २००७ मध्ये पहिल्यांदा अमेरिकेने मांडली. पृथ्वीच्या भूकवचात होणाऱ्या बदलांचा मागोवा घेत राहिले, तर तर त्याचा फायदा भूकंपांचा, भूस्खलनांचा, ज्वालामुखींचा अभ्यास करताना होईल. हा अभ्यास आपल्याला हवामानातील बदल, जागतिक पातळीवरील कार्बनचे चक्र, वृक्षसंपदा, हिमाच्छादित प्रदेश यांच्या सखोल अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल, असे ङ्गनासाफचे म्हणणे होते. त्यानुसार या प्रकल्पावर ङ्गनासाफने २००८मध्ये काम करण्यास सुरुवात केली. त्या दरम्यान असे लक्षात आले, की या मोहिमेच्या उद्दिष्टांमध्ये विज्ञानविषयक अभ्यासाची आणि त्या अभ्यासाचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करण्याची संधी आहे. हे ध्यानात येताच इस्रोने २०१२मध्ये या प्रकल्पात सहभागी होण्याचे ठरवले. यापूर्वी चांद्रयान-१मध्ये नासा सहभागी झाली होती. त्या वेळी ङ्गनासाफचे एक उपकरण घेऊन २२ ऑक्टोबर २००८ या दिवशी भारताचे चांद्रयान-१ चंद्राकडे झेपावले होतं. पण ती मोहीम सर्वस्वी इस्रोची होती. त्या मोहिमेत नासाचे एक उपकरणं घेऊन जाणे इतकाच मर्यादित सहभाग नासाचा होता. ङ्गनिसारफसाठी मात्र २०१४मध्ये नासा आणि इस्रोमध्ये एक करार झाला. ही बाब या मोहिमेने अधोरेखित केली आहे. ती महत्त्वाची आहे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मित्रपक्षच आमनेसामने; बहुसंख्य नगर परिषदात महायुतीच्या घटक पक्षांची वेगळी वाट

**मुंबई :** राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीच्या माध्यमातून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढण्याच्या राजकीय पक्षांच्या घोषणा हवेत विरल्या असून प्रत्यक्षात महायुती आणि म हाविकास आघाडीतील मित्रपक्षच एकमेकांसमोर उभे ठाकले आहे. नगर परिषद निवडणुकांसाठी ठाणे, पालघर, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत भाजप आणि शिवसेना समोरासमोर आले आहेत. काही ठिकाणी राष्ट्रवादी पक्ष स्वतंत्र निवडणूक लढवत आहे.

बदलापूरमध्ये शिवसेना स्वतंत्र लढत असून भाजप आणि राष्ट्रवादी पक्षामध्ये युती आहे. येथे महाविकास आघाडीत शिवसेना (उबाठा) पक्षाकडून उमेदवार देण्यात आले आहेत. पालघर नगर परिषदेमध्ये शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी वेगवेगळे लढत असून महाविकास आघाडीत शिवसेना, राष्ट्रवादी (शप), जनता दल, मनसे एकत्र लढत आहेत. जव्हार नगर परिषदेत भाजप वेगळा लढत असला, तरी येथे शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) या पक्षांची युती झाली आहे. म हाविकास आघाडीमध्ये शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शप) एकत्र आहेत. डहाणूमध्ये भाजपविरोधात शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शप) हे तीन पक्ष एकत्र येऊन महाआघाडी झाली आहे. येथे महाविकास आघाडीमध्ये शिवसेना (उबाठा) आणि माकप हे पक्ष निवडणूक रिंगणात आहेत.अलिबाग येथे महायुतीत भाजप, शिवसेना एकत्र असून राष्ट्रवादीच्या नेत्यांनी अपक्ष उमेदवारी



अर्ज दाखल केले आहेत. तर महाविकास आघाडीतील शेकाप आणि काँग्रेस एकत्र लढत असून शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शप) स्वतंत्र लढत आहेत. पेणमध्ये भाजप, राष्ट्रवादी यांची युती झाली आहे. शिवसेना (शिंदे) वेगळी लढत आहे. येथे पेण विकास आघाडी आणि नगर विकास आघाडी हे स्वतंत्र पॅनल असणार आहेत. मुरुड जंजिरामध्ये भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) यांची युती असून शेकाप, काँग्रेस यांची आघाडी आहे. शिवसेना (शिंदे) आणि शिवसेना (उबाठा) हे पक्ष स्वतंत्र लढत आहेत. महाडमध्ये भाजप, राष्ट्रवादी एकत्र असून शिवसेना (शिंदे) आणि काँग्रेस स्वतंत्र लढत आहेत. शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शप) आघाडीमध्ये आहेत. श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादी-भाजप यांची युती आहे. तर रोह्यात राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्याविरुद्ध इतर पक्ष एकत्र लढत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात महायुती असून त्याविरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना होणार आहे. तर काही ठिकाणी बंडखोरीची शक्यता आहे. रत्नागिरी नगरपरिषदेत शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी यांची महायुती झाली असली, तरी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने येथे नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भाजपसाठी सहा जागा देण्यात आल्या आहेत. चिपळूण नगरपरिषदेत शिवसेना, भाजप युती असून राष्ट्रवादी स्वतंत्र लढणार आहे. खेड, राजापूरमध्येही महायुती एकत्र लढणार आहे.अंबरनाथ नगर परिषदेमध्ये शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी आमनेसामने आहेत. शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि मनसे एकत्र लढणार आहेत. येथे मनसेच्या १४ उम `दवारांनी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या माध्यमातून अर्ज भरल्यामुळे ठाकरे बंधू एकत्र आल्याचे स्पष्ट झाले आहेत. काँग्रेसने मात्र वेगळी वाट धरली आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण या तिन्ही नगर परिषदांमध्ये शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. कणकवली नगरपंचायतीमध्ये शहर विकास आघाडीला शिंदे यांच्या शिवसेनेने पाठिंबा दिला. या पक्षाचे उमेदवार हे शिवसेना (उबाठा) पक्षाशी संबंधित असल्याने नवे समीकरण पाहायला मिळत आहे.

## येवल्यात छगन भुजबळांना शिंदे सेनेचं आव्हान, पवारांच्या राष्ट्रवादीबरोबर युती

**नाशिक :** नाशिकमध्ये छगन भुजबळांना एक धक्का देणारी महत्त्वाची घडामोड घडली आहे. यामागचं मुख्य कारण म्हणजे येवला नगरपरिषदेत महायुतीतील शिंदे गट आणि महाविकासआघाडीतील शरद पवार गटाचे कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन एक महत्वाची युती केली आहे. या युतीचा उद्देश शहराच्या विकासासाठी आहे, हे दोन्ही पक्षातील नेत्यांनी सांगितले आहे. परंतु, या युतीमुळे छगन भुजबळांना मोठा धक्का बसल्याचं बोललं जात आहे, ज्यामुळे त्यांच्या राजकीय गणितात बदल होऊ शकतो.

नाशिक जिल्ह्यातल्या येवला नगरपरिषद निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी एक मोठा राजकीय उलटफेर उघड झाला आहे. शिंदेंच्या शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांचे प्रभावशाली नेते शहराच्या विकासाच्या मुद्द्यावर एकत्र



येऊन काम करणार आहेत. याबाबतच्या अधिकृत घोषणांची तसदीली दोन्ही पक्षांकडून करण्यात आलेली आहे. या युतीचे नेतृत्व शिवसेनेचे आमदार किशोर दराडे आणि शरद पवार गटाचे माणिकराव शिंदे यांनी सांभाळले आहे.त्यामुळे या महत्त्वाच्या घडामोडीनंतर आता येवला नगरपरिषदेत होणारी निवडणूक भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस युती विरुद्ध शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी शरद पवार यांच्यात झुंजण्यासाठी सज्ज झालेली आहे. यामुळे येवला नगरपरिषद निवडणुकीतली रंगत आणखी वाढणार आहे,

## लाडक्या बहिणींना सरकार दिलासा देणार?

**मुंबई :** राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या सर्वाधिक लोकप्रिय ठरलेल्या योजनेसाठी लाभार्थी महिलांना केवायसी करण्याची अंतिम मुदत उद्या १८ नोव्हेंबर रोजी संपत आहे. असं असलं तरी अद्याप १ कोटी १० लाख म हिलांकडून केवायसी करणे अजूनही बाकी आहे. अशातच केवायसी बाकी असणाऱ्या महिलांना दिलासा देण्यासाठी सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेतला जाईल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्यामुळे महिलांची नाराजी टाळण्यासाठी सरकार ई-केवायसीसाठी मुदतवाढ देण्याची शक्यता आहे.लाडकी बहीण योजनेत कुटुंबाचे उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त असलेल्या महिलांचे लाभ बंद होणार आहेत, तसेच आधार आणि मोबाईल नंबर लिंक असणे अनिवार्य आहे. पती किंवा वडील हयात नसलेल्या महिलांसाठी केवायसी प्रक्रियेत बदल केला जाणार आहे.

## ठाकरेंचा नाशिकमधला मोलाचा शिलेदार भाजप खेचून नेणार

**नाशिक :** महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याच्या घडीची मोठी बातमी समोर येत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना धक्का देणारी मोठी बातमी समोर आली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उपनेते अद्वय हिरे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे. उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. विशेष म्हणजे अद्वय हिरे यांचा उद्याच भाजपात प्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ऐन निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला नाशिकम ध्ये खिंडार पडलं आहे. नाशिकच्या राजकारणात हिरे कुटुंबियांचं वर्चस्व राहिलेलं आहे. विशेष म्हणजे मालेगावात हिरे कुटुंबियांची ताकद आहे. त्यामुळे आगामी नगर पंचायत, नगर परिषद निवडणुकांमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.विशेष म्हणजे आज नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकांसाठी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. उद्यापासून प्रत्येक पक्ष खऱ्या अर्थाने प्रचाराचा नारळ फोडणार आहे. या निवडणुकीत अनेक ठिकाणी सत्ताधारी महायुतीमध्येही काही ठिकाणी ताटातूट झालेली बघायला मि ळाली आहे. स्थानिक पातळीवर स्थानिक नेत्यांच्या भूमिका लक्षात घेऊन त्यांना निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य त्या त्या पक्षांनी दिल्यामुळे या निवडणुकांमध्ये फार वेगळे समीकरण बघायला मिळत आहेत. असं असलं तरी भाजप या निवडणुकीत काहीही करुन विजय हिसकावून आणण्याच्या बेतात आहे. याच साठी भाजप मोठे मासे गळाला लावत आहे. अद्वय हिरे यांच्या पक्षप्रवेशाने भाजपची नाशिक जिल्ह्यात खूप मोठी ताकद वाढणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून अद्वय हिरे हे भाजपात जाणार असल्याची चर्चा होती.

# जळगावच्या राजकारणात महायुतीत महायुद्ध, 'मंगेश चव्हाण किस गली में गलबला', किशोर पाटील यांची बोचरी टीका..

**जळगाव :** पाचोरा येथील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांनी राज्यात सर्वात प्रथम स्वबळावर निवडणूक लढण्याचे जाहीर केल्याने महायुतीत फूट पडली. दरम्यान स्वबळाच्या निर्णयामुळे पाचोरा नगर परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना विरुद्ध भाजप अशी लढत होत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी आज आमदार किशोर पाटील यांच्या पत्नी सुनीता पाटील यांनी पाचोरा शहरात जोरदार शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे भाजपच्या वतीने सुनीता पाटील यांच्या विरोधात भाजपचे माजी आमदार दिलीप वाघ यांच्या पत्नी सुचेता वाघ यांना रिंगणात उतरवले आहे. भाजपच्या वतीने पाचोरा शहरात शक्ती प्रदर्शन करत शनिवारीच सुचेता वाघ यांचा उमेदवारी अर्ज हा दाखल केला आहे. दरम्यान, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत आपलाच विजय होईल, असा विश्वास आमदार किशोर पाटील आणि त्यांच्या पत्नी सुनीता पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत. यावेळी किशोर पाटील यांनी भाजप आमदार मंगेश चव्हाण यांच्यावरही टीका केली.

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि युवानेते श्रीकांत शिंदे यांच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद घेऊन आज पाचोरा शहरात शिवसेनेने स्वतंत्र भूमिका घेतली. ही भूमिका घेतल्यानंतर आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेत १७ नोव्हेंबरला एक नगराध्यक्ष आणि २८ नगरसेवकांचा उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. हे दाखल करताना मला अतिशय आनंदाने सांगावसं



वाटत आहे, ज्या पद्धतीने पाचोऱ्यात नागरिकांनी प्रतिसाद दिला तो सर्वांनी पाहिला. आतापर्यंत पाचोऱ्यात अशाप्रकारचं शक्तीप्रदर्शन कधी झालं नाही', असा दावा किशोर पाटील यांनी केला.'आम्ही पाचोऱ्यात अनेक विक्रम केले. पाचोऱ्यात दुसरा कुठला आमदार निवडून येत नव्हता. मला या जनतेने तिसऱ्याला निवडून दिलं. मी आज पाचोरा शहरातील जनतेचा आशीर्वाद घेऊन स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला. तो स्वतंत्र लढण्याचा निर्णय अतिशय योग्य आहे आणि योग्यच राहील. कारण आमच्या रॅलीत असलेली गर्दी. या पाचोरा शहरातील जनता इतिहास करेल. इथे संपूर्ण २८ नगरसेवक आणि १ नगराध्यक्ष शिवसेनेचे जिंकून येतील', असादेखील दावा किशोर पाटील यांनी केला.'मी कॉलेजमध्ये रेसलिंगला होतो. मी कुस्तीपटू आहे. मी कुस्तीपटू असल्यामुळे कुठला डाव टाकायचा याची मला पूर्णपणे कल्पना आहे. हे कितीही मल्ल आहे. तरी सगळ्यांना धोबीपछाड पाचोरा शहरातील जनतेच्या आशीर्वादाने करेन. याची मला शंभर टक्के खात्री आहे', अशी प्रतिक्रिया पाटील यांनी दिली.

# बँकेचे २५ लाख चोरी करणाऱ्या टोळीच्या नांग्या छ.संभाजीनगरच्या पोलिसांनी ठेचल्या..

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण येथील मार्केट यार्ड, नारळा, पैठण येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेतून गोणीत बँकेत जमा झालेली रोख रक्कम भरून दावरवाडी पैठणच्या शाखेत दुचाकीवरून जाणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला धाक दाखवून २५ लाख रूपये लुटण्याची घटना घडली. या घटनेच्या अवघ्या बारा तासात सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे लुटमारी करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्यांची नावे भारत राजेंद्र रूपेकर (वय ३०, रा. नानेगाव, ता. पैठण), विष्णु कल्याण बोधने (वय २४, रा. नानेगाव), सचिन विठ्ठल सोलाट (वय २५, रा. राहुलनगर, उत्तर जायकवाडी, ता. पैठण) आणि विशाल दामोधर पैठण (वय २४, रा. अखातखेडा, ता. पैठण ) अशी आहेत.या प्रकरणी पोलीस अधिक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाचोड पोलीस ठाण्यात गणेश आनंदा पहिलवान (वय ५९, रा. ५९, रा. नवीन कावसान अन्नपूर्णा नगर,



जवळ, पैठण ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गणेश पहिलवान हे सेवानिवृत्त झालेले आहेत. ते बँकेत रोख रक्कम एका शाखेतून दुसऱ्या शाखेत नेण्याचे काम करतात. १५ नोव्हेंबर रोजी गणेश पहिलवान यांनी नारळा पैठण येथील शाखेतून रोख रक्कम गोणीत टाकून स्कुटीवरून पैठण ते पाचोड रोडने दावरवाडी शाखेत जात होते. दावरवाडी शिवारात पाठीमागून एका दुचाकीवर आलेल्या दोन जणांनी पहिलवान यांना धाक दाखवून २५ लाख रूपयांची रोख रक्कम पळवून नेली. या घटनेत पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेनेही सुरू केला. या प्रकरणात बँकेमध्ये काम करणाऱ्यांची चौकशी सुरू करण्यात आली. तसेच दिवसभरात बँकेत आलेल्या लोकांची माहिती काढण्यात आली. या माहितीत संशयीत व्यक्तीची ओळख समोर आली.

पोलिसांनी सीसीटीव्हीसह तांत्रिक माहितीच्या आधारे भारत राजेंद्र रूपेकर याच्यासह त्याचे तीन साथीदार यांना ताब्यात घेतले. या चौघांच्या ताब्यातून २५ लाखांच्या रोख रक्कमेसह सहा लाखांची कार आणि आठ मोबाईल असा एकूण ३१ लाख ५६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. १६ तासांत २५ लाख रूपयांची लुटमारी करणाऱ्या टोळीला ताब्यात घेणाऱ्या गुन्हे शाखेच्या पथकाला पोलीस अधिक्षक डॉ. विनय कुमार राठोड यांनी कौतूक केले.

## पुण्यात सिंहगड कॉलेजजवळच २२ वर्षीय तरुणाची हत्या ; दगडाने ठेचलं

**पुणे :** गुन्हेगारीच्या घटनांमुळे सतत चर्चेत असणाऱ्या पुणे शहरात पुन्हा एकदा एका तरुणाची निर्घृण हत्या झाली आहे. सिंहगड कॉलेजजवळ एका २० ते २२ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. दगडाने ठेचून आणि कोयत्याने वार करून तरुणाची हत्या करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली असून, रात्री उशिरा किंवा पहाटे हा खून झाला असावा असा अंदाज आहे. हत्येचा पॅटर्न पाहता हा पूर्वनियोजित कट असल्याचा पोलिसांना संशय आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक नागरिकांनी रस्त्याच्या कडेला तरुणाचा मृतदेह पाहिल्यानंतर तातडीने सिंहगड रोड पोलीस स्टेशनला याबाबतची माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, प्राथमिक पाहणीत तरुणाच्या डोक्यावर दगडाने मारल्याच्या खुणा आणि शरीरावर कोयत्याने वार केल्याचे दिसून आलं आहे.पोलिसांनी सांगितलं की, 'एका २० ते २२ वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली आहे. दगडाने ठेचून आणि कोयत्याने वार करत तरुणाला मारलं असल्याचा संशय आहे.'दरम्यान, सध्या, मृत तरुणाची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत, जेणेकरून खुनी कोण आहे याचा छडा लावता येईल. या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे.पुणे आणि परिसरात वारंवार खुनाच्या घटना घडत असल्याचं चित्र आहे. पिंपरीत काही दिवसांपूर्वीच मित्रांनी फॉर्च्युनर कारमध्ये तरुणाची हत्या केली होती. नितीन गिलबिले यांची वडमुखवाडी-अलंकापुरम रस्त्यावर फॉर्च्युनर गाडीत हत्या झाली.

या हत्येचा कट चार जणांनी रचला होता, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली. अमित पठारे, विक्रांत ठाकूर, सुमित पटेल आणि आकाश पठारे अशी आरोपींची नावे आहेत. प्राथमिक तपासात आर्थिक व्यवहारातून हा खून झाल्याचे समोर आले आहे. अटक झालेल्या दोन आरोपींवर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत.

## तीन वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात संतापजनक घटना घडली आहे. काल रविवार रोजी रात्रीच्या सुमारास मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे एका ३ वर्षीय चिमुकलीवर एका नराधमाकडून अत्याचार करत तिचा निर्घृण खून केल्याची घटना समोर आली आहे.

या घटनेनं मृत चिमुकलीच्या नातेवाईक आणि मालेगावकरांच्या मनात तीव्र संतापाची लाट उठली आहे. आरोपीला भर चौकात फाशी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे मन सुन्न करणारी घटना घडली असून प्राथमिक माहितीच्या आधारे एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून नंतर तिचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यानंतर संतप्त स्थानिक नागरिकांनी आणि नातेवाईकांनी मालेगाव सामान्य रुग्णालयात एकच गर्दी केली होती. मयत चिमुकलीच्या नातेवाईकांनी हंबरडा फोडत आरोपीला भर चौकात फाशी द्या, अशी मागणी केली आहे.

## मुलीच्या वडिलांचा लग्नास नकार, लेकीच्या साखरपुड्यात बापावर हल्ला

**सांगली :** मिरज तालुक्यातील टाकळी येथे एकतर्फी प्रेमातून लग्नासाठी नकार दिल्याच्या कारणातून वडिलांवर खुरप्याने वार करून गंभीर जखमी केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. तर बापाला वाचविण्यासाठी आलेल्या मुलीचा बोट देखील या हल्ल्यात तुटला आहे. दोघंही जखमींवर मिरज शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, एकावर मिरज ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्याचं काम सुरू होतं.टाकळी येथील अक्षय सुभाष पाटील (रा. टाकळी) याने अभयकुमार रायगोंडा पाटील (रा. टाकळी) यांच्याकडे त्यांच्या मुलीसाठी लग्नासाठी विचारणा केली. अक्षयचं पाटील यांच्या मुलीवर एकतर्फी प्रेम होतं. पण अभयकुमार पाटील यांनी मुलगी देण्यास नकार दिला. या गोष्टीसाठी नातेवाईक तसेच शेजारील नागरिकांनी अक्षय पाटील याची समजूत काढली होती. दरम्यान, अभयकुमार पाटील यांच्या मुलीचा साखरपुडा काल रविवारी सायंकाळी ठेवण्यात आला होता. सदरचा राग मनात धरून एका बॅगेत खुरपे लपवून अक्षय पाटील हा थेट अभयकुमार पाटील यांच्या घराजवळ आला. त्याने मनात धरलेल्या रागातून अभयकुमार पाटील यांच्या डोक्यात खुरप्याने हल्ला चढवला. हल्ला रोखण्यासाठी त्यांची



मुलगी आली असता खुरप्याच्या हल्ल्यात मुलगीचा बोट पूर्णपणे तुटला. हा हल्ला करून अक्षय पाटील याने तिथून पलायन केलं. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या अभयकुमार पाटील व त्यांच्या मुलीला तात्काळ शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. या घटनेची माहिती मिळताच मिरज शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित सिदसण गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी मिरज शासकीय रुग्णालयात दाखल झाले. याबाबत अक्षय पाटील याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम काल रविवारी सुरू होते.कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील भाडळे खिंडीत शनिवारी सायंकाळी घडलेल्या भीषण अपघाताने आंबर्डे गावातील दोन तरुणांना

## ८ महिन्यांचं सोन्यासारखं लेकरु, पतीला तिच्या चारित्र्याचा संशय अन..

**नागपूर :** पती-पत्नीचं नातं हे विश्वासावर घट्ट होत असतं. त्यांच्या प्रेमाच्या नात्याला समर्पण असतं. कितीही संकट आलं तरी जोडीदाराची साथ सोडायची नाही, अशी शपथ दोघांनी घेतलेली असते. एकमेकांच्यासोबत आनंदानं जीवन जगायचं असं दाम्पत्याचं ठरतं. अर्थात संसार करत असताना थोड्याफार कुरबुरी होतात. भांडण, तंटे होतात. पण या भांडणानंतर प्रेम आणखी जास्त घट्ट होतं. दोघे एकमेकांच्या जवळ येतात असं बोलतात. पण नागपूरच्या एका घटनेने सर्वच हादरले आहेत. कारण एका पतीने चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीसोबत वाद घातला आणि त्याचा शेवट खूप वाईट झाला.चारित्र्यावर संशय घेत पतीने गळा आवळून पत्नीची हत्या केली. ही थरारक घटना मानकापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील न्यू गांधी लेआऊट परिसरात घडली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी पतीला अटक केली आहे. सुनील नारायण यदुवंशी (वय २६) असे अटकेतील पतीचे तर १९ वर्षीय मृतक पत्नीचे नाव राणी असं आहे.दोन वर्षांपूर्वी सुनीलचे राणीसोबत लग्न झाले. त्यांना आठ महिन्यांचे अपत्य आहे. कामाच्या शोधात सुनील




हा पत्नी, आईसह नागपुरात आला. तो मानकापुरातील दावत लॉनमध्ये काम करायला लागला. तो येथेच खोली करुन राहत होता. बाजूलाच त्याची आई राहते. काही दिवसांपूर्वी राणी ही त्याला मोबाईलवर चॅटिंग करताना दिसली. त्याने तिच्यासोबत वाद घातला. त्यानंतर तो तिच्या चारित्र्यावर संशय घ्यायला लागला.सुनील १४ नोव्हेंबरला रात्री घरी आला. यावेळी राणी ही मोबाईलवर बोलत होती. त्याला बघताच राणीने मोबाईल बंद केला. ती घाबरली. सुनीलने तिच्याकडून मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न केला. तिने प्रतिकार केला. सुनील संतापला. त्याने राणीला थापड मारली. राणीनेही त्याला मारहाण केली. धक्का देत सुनीलला खाली पाडले. त्यानंतर सुनीलने गळा आवळून राणीचा खून केला.

राणीचा गळा आवळल्यानंतर सुनीलने आईला जागे केले. राणीची प्रकृती खालावल्याची माहिती दिली. त्यानंतर राणीला मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून राणीला मृत घोषित केले. या प्रकरणी मानकापूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. दरम्यान शवविच्छेदन अहवालात गळा आवळल्याने राणीचा मृत्यू झाल्याचे समोर आले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून सुनील याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची १९ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली.

# भारताला फक्त पहिला सामनाच हरवला पण आता.. द. आफ्रिकेच्या प्रशिक्षकांची सिंहगर्जना

**नवी दिल्ली :** भारताने पहिल्या कसोटी सामन्यात यजमान भारतावर दमदार विजय मिळवला. या सामन्यात दक्षिण आफ्रिका पराभूत होईल असे वाटत होते, पण त्यांचा कर्णधार टेंबा बवुमाने संपूर्ण सामनाच फिरवला. त्यामुळे भारतावर पराभवाची नामुष्की ओढवली. आता तर दक्षिण आफ्रिकेच्या प्रशिक्षकांनी सिंहगर्जना केली आहे.पहिल्या कसोटी सामन्यात भारताने पहिल्या दिवशी चांगली पकड मिळवली होती. सामन्याच्या दुसऱ्या दिवशीही भारत हा सामना जिंकेल, असेच वाटत होते. पण त्याचवेळी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सर्व चित्रच बदललं आणि त्यासाठी कारणीभूत ठरला तो कर्णधार टेंबा वबुमा. कारण तिसऱ्या दिवशी टेंबाने तळाच्या फलंदाजांना साथीला घेतले आणि त्याने आपले अर्धशतकही पूर्ण केले. आपल्या संघाला एक सन्मानजनक धावसंख्या त्याने उभारून दिली. त्यामुळेच दक्षिण आफ्रिकेच्या संघाला पहिल्या कसोटीत भारतावर दमदार विजय साकारता आला. पण आता तर दक्षिण आफ्रिकेच्या प्रशिक्षकांनीच





भारताविरोधात सिंहगर्जनाच केली आहे.विजयानंतर दक्षिण आफ्रिकेचे प्रशिक्षक शुकरी कोनराड म्हणाले की, ' भारतामध्ये येऊन इडन गार्डन्सवर खेळायचं आणि गेल्या १५ वर्षांत जे कधीच घडलं नाही ते आम्ही करून दाखवलं आहे. आमच्या संघासाठी हा फक्त विजय नाही तर ही सर्वात मोठी गोष्ट आहे. कारण भारतात कसोटी विजय मिळवणे कधीच सोपे नसते. आम्ही पाकिस्तानला त्यांच्यात मातीत पराभूत केले, आता आम्ही भारतालाही त्यांच्या घरात येऊन पराभूत केले.

पण तरीही आमचे काम अजून पूर्ण झालेले नाही. भारताला आम्ही फक्त पहिल्या सामन्यातच पराभूत केलं आहे, पण इथपर्यंत येऊन आम्ही थांबणार नाही, कारण आमचे एक मोठे काम अजून बाकी आहे. आम्ही आता फक्त पहिलाच सामना जिंकला आहे, पण आता आम्हाला मालिका जिंकायची आहे. त्यामुळे पहिल्या विजयाच्या आनंदात आम्ही मश्गुल झालेलो नाही तर आता दुसऱ्या कसोटीच्या तयारीसाठी आम्ही लागलो आहोत. ' दक्षिण आफ्रिकेच्या प्रशिक्षकांनी पहिल्या विजयानंतर आता सिंहगर्जना करत मोठी गोष्ट सांगितली आहे. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या सामन्यात तर भारताला पराभूत केले, पण आता दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या खेळाकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

## वैभव पाकिस्ताननंतर आता कोणाची धुलाई करणार

**दोहा :** वैभव सूर्यवंशी हा गोलंदाजांचा कर्दनकाळ ठरत आहे. सध्या सुरु असेलल्या आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत त्याने धडाकेबाज फलंदाजी केली आहे. पाकिस्तानच्या साम न्यातही भारताकडून सर्वाधिक धावा या वैभव सूर्यवंशीच्या नावावर होत्या. पण आता वैभव सूर्यवंशीसाठी या स्पर्धेत ही अखेरची संधी ठरू शकते, अशी माहिती समोर येत आहे. भारताचा आता या स्पर्धेत पुढचा सामना कोणत्या संघाबरोबर आणि कधी होणार आहे, याची माहिती आता समोर आली आहे.वैभव सूर्यवंशीने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारताला झोकात सुरुवात करून दिली होती. कारण पहिल्याच चेंडूवर त्याने चौकार लगावला होता. त्यानंतरही त्याने धडाकेबाज फटकेबाजी केली होती. अर्धशतकासाठी तो फक्त पाच धावा दूर असताना त्याने एक मोठा फटका मारला तो कदाचित षटकार ठरू शकला असता, पण त्याची कॅच पकडली गेली आणि तो ४५ धावांवर बाद झाला. यापूर्वी भारताचा ओमानविरुद्ध सामना खेळवला गेला होता. या सामन्यात वैभवने



फक्त ३२ चेंडूंत शतक झळकावले होते, तर या सामन्यात १५ षटकारांच्या जोरावर त्याने १४४ धावांचा डोंगर उभारला होता. पण आता वैभवसाठी स्पर्धेतील पुढचा सामना अखेरचा ठरू शकतो.या स्पर्धेत भारताच्या गटात पाकिस्तान, युएई आणि ओमान हे देश आहेत. भारताचा यापूर्वी युएईबरोबर सामना झला होता, त्यानंतर भारताचा सामना पाकिस्तानबरोबर खेळवला गेला. आता भारताचा पुढचा सामना हा ओमानबरोबर होणार आहे. हा सामना जर भारताने गमावला तर वैभव सूर्यवंशीचा हा अखेरचा सामना ठरू शकतो. भारताचा हा सामना मंगळवारी खेळवला जाणार आहे. त्यामुळे भारताचा हा या स्पर्धेच्या साखळी गटातील अखेरचा साामना आहे. भारताने जर हा सामना जिंकला तर त्यांना पुढचा सामना खेळण्याची संधी त्यांना मिळू शकते, पण जर भारताचा पराभव झाला तर वैभवचा हा या स्पर्धेतील अखेरचा सामना ठरू शकतो.भारताला पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला आणि त्यांची सर्व समीकरणं बिघडली आहेत. त्यामुळे भारतासाठी आता पुढचा सामना करो या मरो असाच असणार आहे.

## आफ्रिदी आपला अपमान विसरला का ?

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानचा क्रिकेट सामना रविवारी दोहा येथे रंगला होता. भारताने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दमदार सुरुवात केली होती. वैभव सूर्यवंशीने पाकिस्तानच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला होता. वैभवला यावेळी नमन धीरची दमदार साथ मिळाली. नमनने ३५ धावांची खेळी साकारली, तर वैभवने ४५ धावा फटकावल्या. भारतीय संघ धावांचा डोंगर उभारेल, असे यावेळी वाटत होते. पण नमननंतर वैभवही बाद झाला आणि भारताचा संघ गडगडला. भारताची २ बाद १०१ अशी स्थिती होती, पण वैभव बाद झाल्यावर भारताचा डाव फकत १३६ धावांत आटोपला आणि तिथेच त्यांचा पराभव जवळपास निश्चित झाला होता. पाकिस्तानने हा सामना १४ षटकांतच जिंकला. या पाकिस्तानच्या विजयानंतर आता शाहीन आफ्रिदीने आपला अपमान विसरत भारताबाबत वक्तव्य केले आहे.पाकिस्तानच्या भारतावरील विजयानंतर शाहीन आफ्रिदी



म्हणाला की, 'पाकिस्तानच्या युवा संघाने आमच्या शेजारील देशावर विजय मि ळवला आहे. पाकिस्तानसाठी ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. आमचे भवितव्य किती आश्वासक आहे, हे आता समोर येत आहे. ' शाहीन आफ्रिदीने पाकिस्तानच्या विजयानंतर वक्तव्य करताना भारताचे नाव घेण्यावर बहिष्कार टाकल्याचे समोर आले आहे. कारण शाहीनला भारताचा पराभव केला, असे म्हणता आले असते. पण त्याने भारताचे नाव घेणे टाळले आणि एक वेगळाच प्रकार आता शाहीन आफ्रिदीने सुरु केला आहे.

## तुम्ही अपयशी ठरताना बैलासारखे फक्त.. हरभजन सिंगने भारतीय संघाची लाज काढली..

**नवी दिल्ली :** भारताचा पहिल्या कसोटी सामन्यात लाजीरवाणा पराभव झाला. त्यानंतर गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीकाही झाली. पण आता भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंगने तर टीम इंडियाची लाज काढली आहे. भारताच्या खेळाडूंशी तुलना हरभजन सिंगने चक्क आता बैलाशी केली आहे. हरभजन सिंगने एका व्हिडिओमध्ये भारतीय संघावर आगपाखड केली असून त्याचा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारताचा डाव पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळला आणि भारतावर पराभवाची नामुष्की ओढवली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा ३० धावांनी पराभव झाला आणि सामना तीन दिवसांतच संपला. भारताचा मानहानीकारक पराभव झाला. त्यानंतर आता हरभजन सिंगने भारताच्या संघावर आसूड ओढले आहेत.हरभजन सिंग म्हणाला की, 'इडन गार्डन्ससारख्या खेळपट्ट्या बनवून आपण कसोटी क्रिकेटचा विनाश करत आहोत. त्यामुळे कसोटी क्रिकेट पूर्णपणे उद्धवस्त होत आहे. कसोटी क्रिकेटला मनापासून श्रद्धांजली. जेव्हा संघ जिंकतो तेव्हा कोणीही काही बोलत नाही. पण जेव्हा पराभव होतो, तेव्हा टीका होते. कोणीतरी विकेट घेत असतो आणि कोणीतरी विकेट घेऊन महान बनत असतो. या अशा खेळपट्ट्या खेळाडूंच्या विकासात योगदान देत नाहीत म्हणून या समस्येवर लक्ष देण्याची वेळ आली आहे. भारचीय संघाती खेळाडू कोणत्याही प्रकारे प्रगती करताना नाही. तुम्ही अपयशी ठरताना तेलाच्या घाण्याला बांधलेल्या बैलासारखे फिरत आहात. तुम्ही जिंकत आहात, पण त्याचा काही खरा फायदा नाही. एक क्रिकेटपटू म्हणून तुम्ही प्रगती करत नाही आहात. इडन गार्डन्ससारख्या खेळपट्ट्या तुम्हाला कुठे घेऊन जात आहेत याचा विचार करण्याची वेळ आली आहे. इथे तुमच्या फलंदाजांना धावा कशा करायच्या हे माहित नाही आणि ते असे दिसतात की त्यांना फलंदाजी कशी करायची हे माहित नाही. सध्याच्या घडीला कसोटी क्रिकेट कसे खेळले जात आहे हे पाहून वाईट वाटते. आपण असे का करत आहोत हे मला माहित नाही, पण या गोष्टी खेळाडूंच्या आणि संघाच्या प्रगतीसाठी मारक ठरत आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बंगळुरुतील कॉन्सर्टमध्ये पॉपस्टार एकॉनसोबत गैरवर्तन



**बेंगळूरू :** आंतरराष्ट्रीय पॉपस्टार एकॉन याला बंगळुरू येथील एका लाईव्ह कॉन्सर्टदरम्यान एका अत्यंत लाजिरवाण्या आणि धक्कादायक अनुभवाला सामोरे जावे लागले. हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत स्टेजवर परफॉर्म करत असताना, काही उत्साही चाहत्यांनी अक्षरशः स्टेजवर चढून एकॉनची पँट खाली खेचली. ही संपूर्ण घटना लाईव्ह कॉन्सर्टदरम्यान घडल्याने, या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड वेगाने व्हायरल होत आहे आणि या कृत्यावर जगभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

बंगळुरूमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या संगीत कार्यक्रमात एकॉन आपला परफॉर्मन्स देत होता. प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह होता आणि एकॉनही आपल्या गाण्यांनी चाहत्यांना थिरकायला लावत होता. याच वेळी, गर्दीतून काही चाहते स्टेजच्या अगदी जवळ पोहोचले आणि त्यांनी एकॉनला पकडण्याचा प्रयत्न केला. स्टेजवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आणि याच गडबडीत एका चाहत्याने एकॉनच्या पायाला धरून त्याची पँट खाली ओढली. हा अनपेक्षित प्रकार घडल्यामुळे एकॉन स्वतःही काही क्षण गोंधळला. तातडीने सुरक्षा कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली आणि चाहत्यांना स्टेजवरून खाली उतरवले. सुदैवाने, या घटनेत एकॉनला कोणतीही शारीरिक इजा झाली नाही, परंतु हा अनुभव त्याच्यासाठी नक्कीच मानसिकदृष्ट्या क्लेशदायक होता. या घटनेचा व्हिडिओ ऑनलाइन व्हायरल होताच, सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली. अनेक युजर्सनी चाहत्यांच्या या कृत्यावर तीव्र शब्दांत टीका केली आहे.

अनेक नेटिझन्सनी या गैरवर्तनाला 'गुंडगिरी' असे संबोधले आहे. एका आंतरराष्ट्रीय कलाकारासोबत सार्वजनिक ठिकाणी असे वर्तन करणे हे योग्य नसल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा लाईव्ह कॉन्सर्ट आणि संगीत कार्यक्रमांमधील सुरक्षा व्यवस्था तसेच प्रेक्षकांचे वर्तन यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एका बाजूला गैरवर्तन करणाऱ्या चाहत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे, तर दुसऱ्या बाजूला कॉन्सर्टच्या आयोजकांनी कलाकारांच्या सुरक्षेची अधिक काळजी घेणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या सोशल मीडियावर 'एकॉन' आणि 'बंगळुरू कॉन्सर्ट' हे विषय ट्रेंड करत असून, कलाकारांचा आदर आणि लाईव्ह शोची नैतिकता यावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. एकॉन किंवा त्याच्या टीमकडून या घटनेवर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.



### कलाकाराच्या सन्मानाचा प्रश्न

लाईव्ह शोमध्ये परफॉर्म करणाऱ्या कलाकाराचा आदर राखणे ही प्रेक्षकांची जबाबदारी आहे, परंतु अशा प्रकारच्या कृत्याने कलाकाराच्या सन्मानाचे उल्लंघन झाले आहे, असे टीकाकारांचे म्हणणे आहे. काही युजर्सनी या निमित्ताने लाईव्ह शोमधील चाहत्यांच्या वर्तनाची आणि त्यांच्या मर्यादांची चर्चा सुरू केली आहे. सेलिब्रिटींना भेटण्याची किंवा स्पर्श करण्याची इच्छा असणे वेगळे, परंतु स्टेजवर जाऊन कलाकारासोबत असे गैरवर्तन करणे हे मर्यादेचे उल्लंघन आहे, यावर बहुतेक युजर्सचे एकमत झाले आहे.



# 'बिग बॉस १९' मध्ये गौरव खन्नाच्या पत्नीची एन्ट्री..!

## प्रणित मोरेपासून दूर राहण्याचा दिला सल्ला



**पुणे :** टीव्हीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस १९'चा फिनाले आता फक्त तीन आठवड्यांवर आला आहे. शोचे आणि शोमधील स्पर्धकांचे अनेक चाहत्यांना यंदाच्या 'बिग बॉस १९'चा विजेता कोण होणार, याची उत्सुकता लागून राहिली आहे. अशातच सोमवारपासून 'फॅमिली वीक'ला सुरुवात झाली आहे. एकेक करत स्पर्धकांचे कुटुंबीय 'बिग बॉस'च्या घरात येत आहेत. अशातच आता गौरव खन्नाची पत्नीही येणार आहे. सोमवारच्या भागात कुनिका सदानंद यांच्या मुलाने शोमध्ये एंट्री घेतली आहे. त्यानंतर अशनूर कौरचे वडील घरात आले. आता अभिनेता गौरव खन्नाची पत्नी आकांक्षा चमेलाही शोमध्ये येणार आहे. याचा एक प्रोमो नुकताच समोर आला आहे. पत्नीला पाहून गौरव खूप भावूक झाल्याचं दिसत आहे. 'बिग बॉस' जाहीर करतात की गौरव खन्नाची पत्नी आकांक्षा घरात येणार आहेत. त्यानंतर गौरव आकांक्षाला पाहून थोडे भावूक होतात. मग 'बिग बॉस' गौरवला फ्रीज करतात आणि दोघे एकमेकांना घट्ट मिठी मारतात. दरम्यान, आकांक्षा आपल्या पतीला प्रणित मोरेपासून दूर राहण्याचा सल्लाही देईल असं सांगण्यात येतंय.

# २५२ कोटीच्या ड्रग्ज नेटवर्कमध्ये श्रद्धा कपूर आणि नोरा फतेहीचे नाव?



**मुंबई :** मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने कुख्यात गुन्हेगार दाऊद ईब्राहीमशी जोडलेल्या एका मोठ्या ड्रग सिंडीकेटला उजेडात आणले आहे. विशेष म्हणजे यात अनेक बॉलीवूड सेलिब्रिटींचे नावही समोर येताना दिसते आहे. अजूनतरी या संदर्भात कोणताही गुन्हा दाखल झाल्याचे समोर येत नाही. या यादीत रॅपर लोका, श्रद्धा कपूर, ओरी, दिग्दर्शक अब्बास मस्तान यांचे नाव समाविष्ट आहे. याशिवाय जिशान सिद्दीकी याचेही नाव या यादीत आहे.

हे सिंडीकेट ड्रग माफिया सलीम डोलामार्फत चालवले जात आहे. सलीम डोलाला दाऊदचा सहकारी मानला जातो. हे नेटवर्क तो दुबईहून चालवत असे. तो देशातील अनेक राज्यात मेफेड्रॉनचा पुरवठा करत असे. सलीमच्या मुलाला ताहिर डोलाला ऑगस्टमध्ये युएईमधून प्रत्यार्पित केले होते. त्यानेच ही माहिती पोलिसांना दिल्याचे समोर येत होते. या रॅकेटची एकूण किंमत २५२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे.



ताहिरने सांगितले की त्याने अनेकदा ड्रग पार्टीचे आयोजन केले आहे. तसेच इतर पार्टीमध्ये ड्रगही पुरवले होते. पोलिसांच्या रिमांड कॉपीमध्ये म्हणले आहे की, त्याने अलीशा पारकर, नोरा फतेही, श्रद्धा कपूर आणि तिचा भाऊ सिद्धार्थ कपूर, जिशान सिद्दीकी, ओरी उर्फ ओरहान, अब्बास मस्तान, लोका यांच्यासोबत अनेकदा ड्रग पार्टीचे आयोजन केले आहे. अर्थात या प्रकरणाचा अजूनही तपास सुरूच आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक: नगरपालिका निवडणूक खर्च समित्यांसाठी मार्गदर्शन सभा



**जनसंचलन/बुलढाणा**
स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील ११ नगरपालिकांमध्ये उमेदवार खर्च समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या कार्यात सुसूत्रता, पारदर्शकता आणि नियमबद्धता आणण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात मार्गदर्शनपर सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा जिल्हा खर्च देखरेख समिती सदस्य सचिव प्रकाश राठोड यांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार उमेदवार खर्च समित्यांनी अनुसरावयाच्या कार्यपद्धती, निकष व जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये उमेदवारांनी केलेल्या दैनंदिन खर्चाची नोंद, पडताळणी आणि ताळमेळ कसा ठेवायचा याची प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली. खर्चासंबंधी सर्व पुरावे, पावत्या व दस्तऐवज नियमानुसार सुरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व उमेदवारांनी खर्च मर्यादेचे काटेकोर पालन करावे यासाठी खर्च समित्यांनी कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे, यावर मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शन सभेला जिल्ह्यातील ११ नगरपालिकांमधील तसेच उपकोषागार आणि पंचायत समित्यांमधील लेखा अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खर्च ताळमेळ व संबंधित प्रक्रियेबाबत उपस्थितांनी विचारलेल्या शंकांचे निरसनही यावेळी करण्यात आले.

# कुष्ठरोग शोध मोहिमेंतर्गत निपाणा ग्रामसभेत कुष्ठरोग मुक्त गाव संकल्प




**जनसंचलन/बुलढाणा**
प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव देवी अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत निपाणा येथे कुष्ठरोग शोध मोहिमेच्या अनुषंगाने मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रामसभा उत्साहात पार पडली. सरपंच संतोष तांदुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी एकत्रितपणे ङ्कुष्ठरोग मुक्त गावफ करण्याचा संकल्प करत मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिनांक १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय मोहिमेत निपाणा ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदविल्याने गाव कुष्ठरोग मुक्तीसाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या प्रसंगी मोताळा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेश जाधव, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अंकिता इंगळे, डॉ. प्रवीण लहाने, आरोग्य कर्मचारी श्रीमती दादेराव, ग्रामपंचायत सदस्य जोशी, ग्रामसेवक श्री सुरडकर, आशा स्वयंसेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामसभेत कुष्ठरोगाविषयी जनजागृती, घराघरात तपासणी, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर उपचार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे निपाणा गावाने आरोग्यदायी आणि रोगमुक्त समाज निर्मितीकडे भक्कम पाऊल टाकले असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

# राजर्षी शाहू फार्मसी महाविद्यालयात अविष्कार स्पर्धा उत्साहात संपन्न

## 30 पेक्षा जास्त महाविद्यालयांतील ३२५ विद्यार्थ्यांचा सहभाग

## विजेत्यांची विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**जनसंचलन/बुलढाणा**
राजर्षी शाहू फार्मसी महाविद्यालय, बुलढाणा येथे अविष्कार सेल, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन अधिवेशन २०२५ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या स्पर्धेत ३० हून अधिक महाविद्यालयांतील ३२५ हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.उदघाटन प्रसंगी मुख्य अतिथी अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे, विशेष अतिथी डॉ. अजय लाड , डायरेक्टर इनोव्हेशन , इन्क्युबेशन अँड लींकेज ,विद्यापीठाच्या अविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनीषा कोडापे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. जैन ,उपप्राचार्य डॉ प्रकाश केंद्रे ,जिल्हा अविष्कार समन्वयक प्रा. डॉ. दीपक लोकवानी , यांची मंचावर उपस्थित होती प्रास्ताविक जिल्हा अविष्कार समन्वयक प्रा. डॉ. दीपक लोकवानी यांनी केले. मुख्य अतिथी अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शैक्षणिक गुणवत्तेसोबतच संशोधन व नवोन्मेष हे भविष्यातील यशाचे आधारस्तंभ ठरणार आहेत. युवकांनी कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि उत्साहाचा संगम घडवत नावीन्यपूर्ण संशोधन करणे गरजेचे आहे.फ्र त्यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे विशेष कौतुक केले. विशेष अतिथी डॉ. अजय लाड , डायरेक्टर इनोव्हेशन , इन्क्युबेशन अँड लींकेज यां नी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ङ्कअविष्कार स्पर्धेचा प्रमुख उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती विकसित करणे, नवसर्जनाला चालना देणे आणि संशोधनातील स्पर्धात्मकता वाढविणे हा आहे.फ्र ङ्कअविष्कार ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांमधील शोधक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि समाजोपयोगी संकल्पना विकसित करण्याचे प्रभावी व्यासपीठ आहे.फ्रतसेच त्यांनी विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे कौतुक करून संशोधन क्षेत्रात भविष्यात भरपूर संधी उपलब्ध असल्याचेही अधोरेखित केले. प्राचार्यांचे प्रेरणादायी भाषण उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. जैन यांनी संबोधन करताना म्हटले की, लहान कल्पनादेखील मोठ्या संशोधनाचा पाया ठरू शकतात. त्या योग्य पद्धतीने विकसित केल्या तर भविष्यात त्या समाजोपयोगी नवकल्पना बनू शकतात.फ्र अधिवेशनातील पोस्टर्स व मॉडेल्सचे मूल्यांकन अमरावती विद्यापीठातील ज्युरी सदस्य डॉ. एन. व्ही. फिरके, डॉ. के. यू. राऊत, डॉ. पी. व्ही. ठाकरे, डॉ. निरज घनवटे, डॉ. यादवकुमार मावळे, डॉ. निलेश कसाट, डॉ. तुषार कोटक, डॉ. ए. एल. राठोड, डॉ. ए. एस. जयस्वाल यांनी अत्यंत बारकाईने केले. यातील विजयी स्पर्धकांची विद्यापीठ स्तरावरील अविष्कार स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. बक्षीस वितरणासाठी विशेष अतिथी म्हणून विद्यापीठाच्या अविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनीषा कोडापे उपस्थित होत्या. त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. विशेष अतिथी डॉ. मनीषा कोडापे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी मांडलेल्या कल्पना, मॉडेल्स आणि संशोधनाची दिशा अत्यंत उत्साहवर्धक आहे. शिल्पकार ठरणार आहेत. मेहनत, सातत्य आणि जिज्ञासा हे संशोधनाचे मुख्य आधार आहेत. विद्यार्थ्यांनी



आत्मविश्वासाने, नवोन्मेषी दृष्टिकोनाने पुढे जात राहावे.फ्र यात्प्रसंगी महाविद्यालयाचे माउपप्राचार्य डॉ प्रकाश केंद्रे, प्रा डॉ शैलेश केवतकर,प्रा डॉ आशिष गवई , प्रा डॉ सुभाष देशमाने , प्रा डॉ सोमनाथ विभुते व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी एम फार्मसी विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संगीता चव्हाण आणि प्रा. द्विप्तेशा डहाके यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. श्रीकांत किरवाले यांनी केले.या अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, समन्वयक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

# अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली राष्ट्रीय एकात्मतेची शपथ



**जनसंचलन/बुलढाणा**

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी श्री. कव्हळे यांनी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, नायब तहसीलदार प्रमोद करे, नाझर गजानन मोतेकर यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## CHANGE OF NAME

| Rajashri Baburao Tayade Age 30 Years, R/o.Sagwan, Buldhana Tq.Dist. Buldana do hereby solemnly affirm and declare as under That my name Tayade Rajashri Baburao and Rajashri Baburao Tayde names are corrects and same person.

Hence declared

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते किसान सन्मान निधीचा २१ व्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण



**जनसंचलन/बुलढाणा**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते किसान सन्मान निधी योजनेचा २१ वा हप्ता वितरण तथा दक्षिण भारत नैसर्गिक शेती संमेलन कार्यक्रमाचे आभासी प्रक्षेपण आज कोईम्बतूर, तामिळनाडू येथून करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यक्रमाचा थेट प्रक्षेपण कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. मार्गदर्शनासाठी आत्मा प्रकल्प उपसंचालक दीपक बुटे, कृषि विज्ञान केंद्र कृषी शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, संचालक मंगेश जाधव, आत्माचे गजानन चौधरी, भारत कापसे तसेच कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना डॉ. नरेंद्रकुमार देशमुख यांनी लाभार्थी शेतकऱ्यांना कृषि विज्ञान केंद्राची भूमिका, शेती विकासासाठी केंद्रातर्फे केले जाणारे प्रयत्न याबाबत माहिती दिली. दीपक बुटे यांनी आत्मा प्रकल्प तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले. कोईम्बतूर येथील मुख्य कार्यक्रमाचे आभासी प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व अधोरेखित करून शाश्वत शेती पद्धती अवलंबण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनेश यदुलवार यांनी केले. जिल्ह्यातील अनेक शेतकरी बांधव आणि महिला शेतकऱ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथील डॉ. जगदीश वाडकर, डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, डॉ. सुकेशनी वाणे, प्रवीण देशपांडे, डॉ. भारती तिजारे, डॉ. अनिल तारू, मनेश यदुलवार यांच्यासह शिवाजी पिसे, नितीन काटे, कोकिळा भोपळे, नंदकिशोर ढोरे, अनुराधा जाधव, अनिल जाधव, कृष्ण चौरे आणि गणेश इंगळे यांनी परिश्रम घेतले.

